**कृपया प्रसिद्धीसाठी** **14 सप्टेंबर 2011**

## कुष्ठपीडितांचे राष्ट्रपतींना साकडे

**नवी दिल्ली,गुरुवार:** ''कुष्ठपीडितांना कलंकरहित, सन्मानाचे व उद्देश्यपूर्ण आयुष्य जगता यावे तसेच देशातून कुष्ठरोगाचे संपूर्ण निर्मूलन व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन महामहीम राष्ट्रपती श्रीमती प्रतिभा पाटील यांनी आज त्यांच्याकडे कुष्ठपीडितांची गा-हाणी घेऊन आलेल्या शिष्टमंडळाला दिले. माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांच्या नेतृत्वाखाली कुष्ठपीडितांच्या समस्या सोडविण्यासाठी एका उच्चस्तरीय शिष्टमंडळाने राष्ट्रपतींची भेट घेतली. नॅशनल फोरम ऑफ लेप्रसी अफेक्टेड पर्सन्स चे अध्यक्ष डॉ. पी.के. गोपाळ, इंटरनॅशनल लेप्रसी युनियनचे अध्यक्ष डॉ.शरद्‌चंद्र गोखले, हिंद कुष्ठ निवारण संघाचे श्री. उदय ठकार, महाराष्ट्र कुष्ठपीडित संघटनेचे अध्यक्ष श्री. बळीराम तांबडे, संजय नगर रहिवासी संघ, मुंबईचे अध्यक्ष श्री. भिमराव मधाळे व दिल्लीचे कार्यकर्ते श्री. एस.के. दत्ता यांचा या उच्चस्तरीय शिष्टमंडळात समावेश होता.

या विषयाची पार्श्वभूमी सांगताना श्री. राम नाईक म्हणाले,''कुष्ठपीडितांसाठी काम करणारे काही मान्यवर व कुष्ठपीडितांच्या वस्त्यांचे काही प्रतिनिधी यांच्यासह कुष्ठपीडितांच्या समस्या व त्यांच्या सशक्तिकरणाबाबत मी राज्यसभेत 5 डिसेंबर 2007 रोजी एक विनंती अर्ज दाखल केला होता. विनंती अर्ज समितीचे तत्कालीन अध्यक्ष श्री.वेंकैया नायडू यांच्या नेतृत्वाखाली समितीने अनेक राज्यांच्या व ठिकठिकाणच्या कुष्ठपीडितांच्या वस्त्यांचा दौरा केला. सखोल अभ्यास व चर्चेनंतर या समितीने 24 ऑक्टोबर 2008 रोजी राज्यसभेत आपला अहवाल सादर केला. वेगवेगळ्या मंत्रालयांच्या प्रतिसादानंतर पुन्हा एकदा समितीने केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भातील कृती अहवाल - (एटीआर) 22 नोव्हेंबर 2010 रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवला. मूळ अहवालात व 22 नोव्हेंबर रोजी सादर केलेल्या अहवालात कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी दिलेल्या शिफारसींबाबत आम्ही सर्व याचिकाकर्ते समाधानी होतो.''

''समितीच्या शिफारसी वेगवेगळ्या मंत्रालयांशी संबंधित होत्या. पंतप्रधानांनी हस्तक्षेप केल्यास या शिफारसींची तातडीने अंमलबजावणी होऊ शकेल असे वाटल्याने आम्ही 1 जानेवारी 2011 रोजी पत्र लिहून त्यांच्या भेटीची

वेळ मागितली. त्यानंतर 20 जानेवारी व 10 फेब्रुवारी रोजी स्मरण पत्रेही पाठविली. तथापि त्यांच्याकडून साधी पोचही न आल्याने अखेर 9 मार्च 2011 रोजी त्यांना ‘संकट संदेश’(SOS) देणारे पत्र पाठविले. दुर्दैवाने त्यालाही पंतप्रधानांनी प्रतिसाद दिला नाही. पंतप्रधानांची ही संवेदनहीनता खूपच दुःखद होती. दरम्यान, 25 मार्च 2011 रोजी संयुक्त राष्ट्रसंघाने एक ऐतिहासिक ठराव मंजूर केला. संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रस्ताव क्र. 65/215 मध्ये कुष्ठपीडित व त्यांच्या कुटुंबियांना दिली जाणारी सापत्नभावाची वागणूक बंद व्हावी व त्यादृष्टीने अंमलबजावणी सुरु व्हावी यासाठी मार्गदर्शक तत्वे दिली गेली. या घटनेनंतर आम्ही देशाची सर्वोच्च व्यवस्था अर्थात महामहीम राष्ट्रपतींना थेट साकडे घालण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आज आम्ही आमच्या सूचना व मागण्या राष्ट्रपतींसमोर मांडल्या.’’ असेही श्री. राम नाईक म्हणाले.

शिष्टमंडळाने पुढील बाबींमध्ये हस्तक्षेप करण्याची राष्ट्रपतींना विनंती केलीः1) कुष्ठपीडितांच्या सशक्तीकरणासाठी सामाजिक - आर्थिक पुनर्वसन धोरण तयार करणे, 2) मूळ याचिकेत नमूद केलेल्या 16 कायद्यांमध्ये सुधारणा करणे, 3) कुष्ठपीडितांच्या उदरनिर्वाहासाठी मिळणा-या भत्त्यात रु. 2000/- पर्यंत वाढ करणे तसेच सर्व राज्यात समान भत्ता देणे, 4) गरीबी रेषेच्या खालील नागरिकांना व अपंगांना मिळणारे सर्व सामाजिक व आर्थिक लाभ कुष्ठपीडितांनाही देणे, 5) कुष्ठपीडितांच्या वस्त्यांना नागरी सुविधा देणे, 6) कुष्ठपीडितांच्या मुलांच्या उच्चशिक्षणाची सोय व त्यासाठी शिष्यवृत्ती देणे, 7) कुष्ठपीडितांद्वारे निर्माण केलेल्या वस्तूंवर व्हॅट न लावणे, 8) राष्ट्रीय ग्रामीण स्वास्थ्य उपक्रमाच्या राज्य व जिल्हास्तरीय समित्यांवर तसेच कुष्ठपीडितांच्या केंद्रिय पुनर्वसन मंडळावर कुष्ठपीडितांचे प्रतिनिधी नेमणे, 9) कुष्ठरुग्णांच्या संख्येत झालेली वाढ किंवा कुष्ठरोगाचे निर्मूलन याबाबतची सद्यस्थिती जाणण्यासाठी देशपातळीवर सर्वेक्षण करणे व 10) कुष्ठपीडितांशी संबंधित सेवाकार्यांमध्ये कुष्ठपीडितांचा सहभाग वाढावा यासाठी जागतिक आरोग्य संघटनेच्या (WHO) मार्गदर्शक सूचनांची अंमलबजावणी करणे.

‘‘महामहीम राष्ट्रपतींशी झालेल्या चर्चेमुळे व त्यांच्या आश्वासनांमुळे आम्ही समाधानी आहोत. त्यांच्या आश्वासनांच्या पूर्ततेची आता आम्ही आतुरतेने वाट पाहू’’, असे श्री. नाईक अखेरीस म्हणाले.

**(कार्यालय सचिव)**